# प्रकरण दुसरे

# आधुनिक कथा आणि मराठीतील स्त्रीकथाकार

पृष्ठ - १६ ते ३७

# प्रकरण दुसरे
# आधुनिक कथा आणि मराठीतील स्त्रीकथाकार

**प्रस्तावना :-**

स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्त्व ओळखून म. जोतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया सर्वात प्रथम रोवला. आपल्या पत्नीला शिक्षण देऊन त्यांनी प्रथम त्यांना शिक्षिका बनविले आणि स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य केले. तसेच लोकहितवादी, आगरकर यांनीही स्त्रियांच्या आणि दलितांच्या उध्दारासाठी प्रयत्न केले. नवशिक्षितांची पिढी जशी पुढे शिकू लागली तसतसे स्त्रियांच्या शिक्षणाला महत्त्व येऊ लागले. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरूष तुलना' हा लेखसंग्रह लिहून स्त्रियांच्या विविध समस्या मांडल्या. स्त्री शिक्षण, पुनर्विवाह, विधवा पुनर्विवाह इ. विषयक विचार त्यांनी आपल्या लेखातून मांडले. तसेच बालविवाह, बालजरठविवाह, वैधव्य अशा सामाजिक समस्यांवर स्त्रियांनी कथालेखन केले. काशीताई कानिटकर, गिरीजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के ह्या पहिल्या टप्प्यावरील लेखिका आहेत. १९३५ नंतर विभावरी शिरूरकर ह्यांनी 'कळ्यांचे नि:श्वास' हा कथासंग्रह लिहून स्त्री मनाचे सखोल दर्शन घडविले. विभावरी शिरूरकर त्या काळात नोकरी करीत होत्या. त्यामुळे त्यांना अवतीभोवतीचे जीवन, राहणीमान, राजकीय, सामाजिक परिस्थिती माहिती होती. तसेच कुसुमावती देशपांडे यांनीही या काळात लेखन केल्याचे दिसते. तसेच मुक्ताबाई दीक्षित यांनी 'अनिरूध्द प्रवाह' व 'मानसलहरी' हे दोन कथासंग्रह लिहिले. सूक्ष्म मनोविश्लेषण व स्त्री जीवनातील नव्या-नव्या समस्या यांचे दर्शन आपणांस सौ. कमलाबाई टिळक यांच्या कथांतून होते. त्यांच्या कथांतून बाह्य घटनांपेक्षा तरल भावनांनाच महत्त्व मिळाले आहे. त्यामुळे त्यांच्या कथा मनावर अधिक परिणाम करतात.[१] आनंदीबाई किर्लोस्कर, कुमुदिनी रांगणेकर, शांताबाई नाशिककर, पिरोज आनंदकर, मालतीबाई दांडेकर इ. कथालेखिका कथालेखन करताना दिसतात. याच काळात फडके व खांडेकर हे दोन

लेखक लेखन करताना दिसतात. फडके यांनी कथेच्या तंत्राची चौकट सांगितली. तंत्रदृष्टया, प्रकारदृष्टया आणि विषयांच्या विविधतेत या काळात बराच बदल झाला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र लोकांच्या ज्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा होत्या त्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. बेकारी, शहरीकरण, वाढती लोकसंख्या, यांत्रिकीकरण इ. समस्या भेडसावू लागल्या आणि अशा समस्या कथालेखिका आपल्या कथांमधून मांडू लागल्या. नियतकालिक आणि मासिकांनी या काळात कथालेखिकांना बरेच सहाय्य केले. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' हे मनोरंजन मासिकाचे ब्रीदवाक्य होते त्यामुळे या मासिकाचा स्त्रीविषयक दृष्टीकोन बराच उदार होता.

१९५० नंतरच्या कालखंडातील कथेचा आकार लहान व सुटसुटीत झाला. कथेतून नीतीबोध व मनोरंजन होते. तसेच कथा लिहिताना जास्त चिंतनाची आवश्यकता नसते. कथेमध्ये आदि, मध्य व अंत असे तीन टप्पे मानले जातात. त्यामुळे कथेमधील संघर्ष हा सासू-सून, नणंद-भावजय, पती-पत्नी, वडील-मुलगा, वृध्द वडील, प्रौढ कुमारिका इ. निरनिराळ्या स्वरूपात येतो. तसेच लेखिकेच्या अनुभवानुसार कथेचे स्वरूप लवचिक होत गेले. १९५० ते २००० या कालखंडातील अनेक लेखिकांनी लेखन केल्याचे दिसते. मालतीबाई दांडेकर, सुमन भडभडे, योगिनी जोगळेकर, शैलजा राजे, शकुंतला गोगटे इ. लेखिकांनी सामान्य वाचकांसाठी लिहिलेले दररोजच्या जीवनातील घटनाप्रसंगावरील आधारलेले वाङ्मय हे लोकप्रिय मनोरंजक वाङ्मय म्हणून ओळखले जाते.

कमला फडके यांनी 'मकरंद', 'एक होता राजा', 'तेरी चूप मेरी चूप', 'गुलमोहर', 'तीन उणे दोन', 'मातीचा हत्ती', 'दरवळ' इ. कथासंग्रह लिहिले. परंतु त्यांच्या या कथासंग्रहातील कथा ह्या हलक्याफुलक्या, केवळ वाचकांचे मनोरंजन करण्यासाठी लिहिलेल्या कथा वाटतात. त्या वरवरची चित्रणे करतात. स्नेहलता दसनूरकर यांनी 'कळप', 'मायावी', 'अंधारातील व्यथा', 'स्नेहांकिता', 'नदीचं पाणी', 'मुक्ती', 'सुजाता'इ. कथासंग्रह लिहिले आहेत. त्यांच्या कथा घटनाप्रधान वाटतात.

त्यांनी आपल्या कथा लिहिताना हसतखेळत प्रारंभ, नंतर गुंतागुंत शेवटी आनंदीआनंद असा कथेचा साचा वापरला आहे. इंद्रायणी सावकार यांनी 'लष्कराच्या भाकऱ्या', 'अलबत्या गलबत्या', 'तेथे पाहिजे जातीचे','घरकी मुर्गी', 'एकेकाचे नशीब', 'मंगळसूत्र' इ. कथासंग्रह लिहिले असून त्यांना आपल्या कथा विनोदी वाटतात. योगिनी जोगळेकर यांनी जवळपास ३५ कथासंग्रह लिहिले असून ५० कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्या घर आणि त्यातील माणसे यांच्या सुखदु:खाचे चित्रण करतात. त्यांच्या साहित्यातील 'मम्मी' ही व्यक्तिरेखा कृत्रिम व्यवस्थेची प्रतिनिधी आहे. 'नियती'चा वावर त्यांच्या कथांतून मुक्तपणे होत असताना दिसतो. शिवाय कुठली ना कुठली कल्पना योजून कथेच्या शेवटी आनंदी आनंद तरी त्या निर्माण करतात किंवा पात्रांना मृत्यूची वाट तरी दाखवतात.

सौ. शकुंतला गोगटे यांच्या नावावर २५ कादंबऱ्या आणि तेवढेच कथासंग्रह आहेत. 'झपूर्झा', 'सावलीचा चटका', 'नजरबंदी', 'मर्यादा', 'बोलक्या भिंती', 'भरतीची लाट', 'शहारा', 'स्वल्पविराम', 'प्रसाधन' इ. कितीतरी कथासंग्रह शकुंतला गोगटे यांनी लिहिले आहेत. त्यांच्या कथांमध्ये गैरसमज, अपघात, योगायोग इ. ना महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या कथासंग्रहामध्ये स्त्रियांना स्वत:चे वैशिष्टय नाही. केवळ स्त्रियांची कामापुरती चित्रणे आहेत. शैलजा राजे यांचे एकूण चार कथासंग्रह असून त्यांनी हौसेपोटी कथालेखन केले असावे. घटस्फोट, छळ, पुनर्विवाह, प्रेमप्रकरण असे त्यांच्या कथांचे विषय असतात. त्यांचे कथालेखन कंटाळवाणे वाटते आणि त्या स्वप्नाळू आणि हळूवार कथालेखंन करतात. शिकलेल्या नोकरी करणाऱ्या स्त्रिया संकट आल्यावर प्रथम नवऱ्याच्या आश्रयाला धावतात याचेही चित्रण त्या करतात. शैलजा राजे, स्नेहलता दसनूरकर, शकुंतला गोगटे इ. लेखिका थोडेच पण चित्तवेधक लेखन करणाऱ्या कथालेखिका आहेत. सुमती क्षेत्रमाडे ह्या वैद्यकीय डॉक्टर असून त्यांच्या कथा पारंपारिक, स्वप्नपध्दतीच्या, भावविवश अशा कथा आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री ही प्रेम, त्याग, निष्ठा, वात्सल्य या सर्व गुणांनी संपन्न अशी आहे. 'गिरिजा कीर'

यांच्या नावावर सात कथासंग्रह असून त्यांच्यावर वि.स. खांडेकर व साने गुरूजी यांच्या मांडणी व भाषेचे संस्कार असावेत असे निरीक्षणावरून जाणवते. त्या मध्यमवर्गीय स्त्रियांचे चित्रण करतात. इंदुमती शेवडे, लता सप्रे, सुशीला चिकटे, वर्षा रेगे, कुमुदिनी रांगणेकर, नयना आचार्य, विजया काळे इ. कथालेखिका वास्तवाचे चित्रण करतात. तसेच मध्यमवर्गीय स्त्रीचे चित्रण, अकृत्रिम निवेदनपध्दती, त्याग, पावित्र्य, साहसी इ. गुणवैशिष्टयांनी युक्त अशा त्यांच्या कथा आहेत. भडक, शब्दबंबाळ असे लेखन या लेखिका करताना दिसतात. तसेच वृध्द आईवडिल, मुले यांच्यातील दुरावा लेखिकांच्या कथांमध्ये येतो. अशा ह्या दररोजच्या जीवनातील घटनांवर लोकप्रिय मनोरंजक कथा लिहिणाऱ्या कथालेखिका आहेत.

**मनोविश्लेषणात्मक कुटुंबकथा :-**

मनोविश्लेषणात्मक कुटुंबकथा लिहिणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत. वसुंधरा पटवर्धन, शान्ता शेळके, इन्दिरा संत, सरोजिनी बाबर, शिरीष पै, लीला श्रीवास्तव, आशा बगे, सुनीती आफळे इ. मनोविश्लेषणात्मक कुटुंबकथा लिहिणाऱ्या कथालेखिका आहेत. 'नवकथेतील अप्रकट मनाची गुंतागुंत, संज्ञाप्रवाह इ. च्या वाटेला फारशा स्त्रिया गेलेल्या नाहीत. त्यांना देह आणि मन यांच्या गरजा स्वतंत्र आहेत ही जाणीव हळूहळू होऊ लागली. त्यांच्या सभोवतालच्या व्यक्ती उदा. प्रौढ कुमारिका, विधवा, वृध्द तरूणींचे दु:ख त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.[२]

**१) वसुंधरा पटवर्धन :-**

वसुंधरा पटवर्धन यांचे जवळपास २० कथासंग्रह असून त्यांनी 'शोध', 'संसारशोभा', 'अक्षता', 'भोवरा' इ. संग्रह लिहिले आहेत. 'माणसामाणसातील गुंतागुंतीच्या नात्याचे दर्शन घडविणाऱ्या कथादेखील त्यांनी लिहिलेल्या आहेत. ('जप्ती', 'बाबूकाका') किशोरावस्थेतील बालिकेच्या मनाचे पदर हळूवार हाताने उलगडणारी 'अंकुर' सारखी कथा त्यांच्या नावावर जमा आहे. पत्नीची कामे आपण सहज करू शकू असा गैरविश्वास बाळगणाऱ्या नवऱ्यावर दीड दिवस घर सांभाळण्याची

जबाबदारी येऊन पडल्यानंतर काय होते याचा किस्सा 'माझ्यावर पडलेले घर' या कथेत वसुंधराबाई मोठ्या रंजक पध्दतीने सांगतात. चमत्कारिक कल्पना अथवा अतिशयोक्ती यांचा आधार न घेता किंवा स्त्री-पुरूष जातीचा कोणत्याही प्रकारे उपहास न करता साध्या साध्या प्रसंगातून वसुंधराबाईंनी येथे केलेली विनोदाची निर्मिती उल्लेखनीय आहे.'[३] वसुंधरा पटवर्धन यांनी प्रौढ कुमारिका, विधवा, वंचिता इ. स्त्रियांची नानाविध दु:खे मांडली आहेत. पात्रांच्या मानसिक अवस्थांचा त्या चांगल्या प्रकारे शोध घेतात.

**२) शिरीष पै :-**

शिरीष पै ह्या १९५५ नंतरच्या महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांच्या नावावर एकूण अठरा कथासंग्रह आहेत. त्यांनी 'चैत्रपालवी', 'हापूसचे आंबे', 'मयूरपंख', 'खडकचाफा' इ. कथासंग्रह लिहिले असून त्या स्त्रीच्या दु:खाचा शोध घेतात. स्त्री आणि पुरूष यांच्यातील नाते नेमके कोणते आणि ते मानवी पातळीवरचे की पशुपातळीवरचे असा प्रश्न पडतो. शिरीष पै यांना आचार्य अत्रे यांचा वारसा मिळाला. त्यांच्या कथा उच्च मध्यमवर्गीयांच्या कथा आहेत. त्यांच्या कथा घटनाप्रधान असल्या तरी मनोविश्लेषणात्मक आहेत.

**३) सरोजिनी बाबर :-**

सरोजिनी बाबर ह्या लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक आहेत. त्यांनी 'नव्याची पुनव', 'काचेची पेन्सील', 'मुक्तांगण', 'डोंगरची मैना' इ. १४ ते १५ कथासंग्रह लिहिले आहेत. ग्रामीण भागातील रूढी, परंपरा, चालीरीती या सर्वांचे चित्रण त्या करतात. तसेच त्यांच्या कथेतील नायिका नियतीला शरण जाताना दिसतात. स्त्रियांच्या दु:खाचे विविध पदर सरोजिनी बाबर उलगडून दाखवितात. 'ग्रामीण परिसर, त्यातील सणवार, श्रध्दा, कुळाचार हा सरोजिनीबाईचा खास अनुभवाचा प्रांत आहे. सातारा-कोल्हापूरकडील हा परिसर, तेथील माणसे यांच्यात रंगतात. कामानिमित्त

शहरात वास्तव्य असले तरी मनाने खेड्यातच असतात. तेथून त्यांना कथा गवसलेल्या आहेत.[४]

४) **लीला श्रीवास्तव :-**

सौ. लीला श्रीवास्तव यांनी 'जखमा', 'फाशी गेलेली उन्हं', 'माझ्या अंगणातला कॅक्टस', 'एक लेखणी सुळावर' इ. कथासंग्रह लिहिले आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री-पुरूष भडक विचार मांडतात. भ्रष्टाचार, दारिद्रय, विषमता याचे त्या चित्रण करतात. सभोवतालच्या परिसरातील समस्या त्या अचूक निरीक्षणाने टिपतात.

५) **इन्दिरा संत :-**

इन्दिरा संत यांचे 'श्यामली', 'चैतू' आणि 'कदली' असे तीन कथासंग्रह आहेत. वेगवेगळ्या स्तरातील स्त्रियांच्या दुःखाचे चित्रण त्या करतात. तसेच अपत्यसंभव, बाळंतपण, कष्ट अशा स्त्रियांचेही त्या चित्रण करताना दिसतात. इन्दिरा संत कवयित्री म्हणून सर्वांना परिचित आहेत.

अशा ह्या मनोविश्लेषणात्मक कुटुंबकथा लिहिणाऱ्या कथालेखिका यांनी कुटुंबातील विविध समस्या, व्यक्तीव्यक्तीमधील संबंध, कुटुंबाची जबाबदारी असणाऱ्या स्त्रियांची चित्रणे आपल्या कथासाहित्यातून मांडली आहेत.

**साठोत्तरी कथालेखिका :-**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ज्याप्रमाणे स्त्रिया लेखन करताना दिसतात त्याप्रमाणेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांनी बदलत्या समाजजीवनाचे, कुटुंबसंस्थेचे, मानवी नात्यांचे बदलते स्वरूप, बदलत्या जीवनविषयक कल्पना या सर्वांचे चित्रण आपल्या साहित्यातून केल्याचे दिसते. '१९६० नंतर आशय व अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी मराठी कथेला जी जी नवी परिमाणे लाभली ती मिळवून देण्यात १९६० नंतर उदयास आलेल्या पुरूष-कथाकारांइतकेच कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, सरिता पदकी, तारा वनारसे व वसुधा पाटील या लेखिकांचे कथालेखन कर्तृत्व कारणीभूत ठरले.'[५] यामध्ये प्राधान्याने लेखन करणाऱ्या सुधा नरवणे ह्या कथालेखिका अग्रगण्य मानल्या जातात.

**१) सुधा नरवणे :-**

सुधा नरवणे यांनी 'दोलाचल', 'सरणं गच्छामि', 'इंद्रधनु' असे एकूण सात कथासंग्रह लिहिले आहेत. मानवी मनातील आंदोलने त्यांनी आपल्या कथेत चित्रित केली आहेत. घटनांचा आधार घेऊनही पात्रांची मानसिक आंदोलने किती समर्थपणे टिपता येतात याचा प्रत्यय सुधा नरवणे यांच्या कथा वाचकांना आणून देतात. मानसिक संघर्षाचे वेधक चित्र त्यांच्या 'ध्यास' सारख्या कथेत उमटते. माणसांच्या मानसिक क्रिया-प्रतिक्रिया त्या तितक्याच नेमकेपणाने टिपत जातात,पण त्यासाठी दुर्बोधतेच्या पातळीवर जाणारे मनोविश्लेषण किंवा जाणीव-नेणिवेतील गुंतागुंत यांचा आधार घेत नाहीत. 'विरत गेलेलं धुकं', 'तिचं स्वप्न', 'दोलाचल', 'ऋणमुक्ता' या यशस्वी कथांत देखील अभिव्यक्तीचे हेच सूत्र सुधाबाईंनी कायम ठेवलेले आहे.[६]

**२) सरिता पदकी :-**

सरिता पदकी यांचे 'बारा रामाचं देऊळ' आणि 'घुस्मट' हे दोन संग्रह असून त्यांना स्त्रियांच्या दु:खाचे चित्रण करण्यात रस आहे. त्यांच्या कथेतील निवेदक अधूनमधून भाष्य करतो. त्यांच्या कथा स्त्रियांच्या दु:खाच्या अनेक छटा दर्शवतात आणि दु:ख स्वीकारण्याची तयारी दाखवितात.

**३) तारा वनारसे :-**

तारा वनारासे यांनी केवळ एकच 'पश्चिमकडा' हा कथासंग्रह लिहिला आहे. स्त्रियांच्या भावविश्वातील आंदोलने त्या शब्दबध्द करतात. त्या व्यक्तीच्या मनात-शिरून त्याचे पदर उलगडून दाखवितात.

**४) विजया राजाध्यक्ष :-**

विजया राजाध्यक्ष यांनी 'अधांतर', 'अनोळखी', 'विदेही', 'पारंब्या', 'टिंबे', 'अनोळखी' असे कितीतरी कथासंग्रह लिहिले आहेत. विजया राजाध्यक्ष हया आघाडीच्या कथालेखिका आहेत. त्यांच्या कथा विचार करायला लावतात. स्त्री शरीरकेंद्री अनुभवाचे त्या चित्रण करतात. स्त्रियांना वाटणारे लैंगिक आकर्षण, पुरूषांची

वाटणारी ओढ याचे चित्रण उत्कटतेसह व्यक्त करतात. विजयाबाई पांढरपेशा समाजाचे वर्णन करतात. शरीराने आणि मनाने अतृप्त असणाऱ्या वर्गाची दु:खे विजयाबाई आपल्या कथेतून मांडतात. तसेच त्या आधुनिक स्त्रीचे चित्रण करतात. सामान्य पातळीवरचे अनुभव त्या नटवून सांगतात.

**५) ज्योत्स्ना देवधर :-**

ज्योत्स्ना देवधर ह्या कराड येथे भरलेल्या महाराष्ट्र कथालेखिका संमेलनाच्या (१९७५) अध्यक्षा होत्या. त्यांनी विपुल कथालेखन केले. 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या', 'गजगे', 'बोच', 'आकाशी' इ. कथासंग्रह आहेत. 'बोधनामय (perceptual)व रसगंधवती भाषा आणि कथानुभवाची वैशिष्टयपूर्ण मांडणी हे ज्योत्स्ना देवधर यांच्या कथेचे वेगळेपण आहे. वसुंधरा पटवर्धन यांच्याप्रमाणेच ज्योत्स्ना देवधर यांचे कथाविश्व स्त्रीकेंद्रित आहे. दु:ख या भावनेचे त्यांना सर्वाधिक आकर्षण आहे. आपल्या कथेसाठी एखादा नाट्यमय व संघर्षात्मक प्रसंग त्या निवडतात. परंतु बऱ्याचवेळा नाट्यमयतेबद्दलचे आकर्षण त्यांच्या कथांना भडकपणाकडे घेऊन जाते. आपल्या भाषेचे सामर्थ्य जाणून तिला अकारण राबविण्याचा प्रयत्न ज्योत्स्ना देवधर करत आहेत की काय अशी शंका देखील त्यांच्या काही कथा वाचताना आल्याशिवाय राहत नाही.[७] ज्योत्स्ना देवधर ह्या घरंदाज स्त्रियांची चित्रणे करतात. त्यांच्या कथा मनोविश्लेषणात्मक कुटुंबकथा आहेत.

**६) छाया दातार :-**

छाया दातार यांचा 'गोष्ट साधी सरळ सोपी' हा कथासंग्रह असून संसारी स्त्रीच्या व्यथा त्यांनी मांडल्या आहेत. छाया दातार यांना वर्तमानाची ओढ आहे. त्यांच्या कथेत 'घटस्फोटाची' चर्चा येते. भूतकाळातील स्त्रीचे दास्य नाहीसे व्हायला हवे असे त्यांना वाटते.

७) **पद्मजा फाटक :-**

पद्मजा फाटक यांचे दोन कथासंग्रह असून 'राही' हा त्यांचा एक कथासंग्रह आहे. त्यांची साधी, सरळ, सोपी आणि ओघवती अशी भाषाशैली आहे. त्यांना स्त्री-पुरूष संबंधाचे चित्रण करण्यात रस आहे. त्यांच्या कथेत 'मी' ला स्थान आहे.

८) **आशा बगे :-**

आशा बगे यांचे पाच कथासंग्रह आहेत. 'मारवा', 'अत्तर', 'पूजा', 'ऋतूवेगळे', 'निसटलेले' हे त्यांचे कथासंग्रह असून त्यांनी आपल्या कथांमधून बदललेल्या कुटुंबव्यवस्थेचे, स्त्रीच्या अस्तित्वाचे भान आणि मध्यमवर्गीय लोकांची बदलेली जीवनमूल्ये यांचे चित्रण केले आहे. जुन्या परंपरा जपणाऱ्या आणि आपल्या अस्तित्वासाठी बंडखोरी न करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण त्या करतात.

९) **सुनीती आफळे :-**

'कुंपणापलिकडच्या बकुळी', 'बाभळी', 'अनाथ', 'बाहुल्या' हे कथासंग्रह सुनीती आफळे यांनी लिहिले असून त्यांच्या काही कथांचे हिंदी, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, गुजराती, तेलगु, कानडी भाषेत अनुवाद झाले आहेत. 'स्त्री प्रश्नांची जाणीव त्यांच्या कथेत येते परंतु त्यांच्या कथानायिका बंडखोर भूमिका घेत नाहीत. जीवनातील समस्या, ताणतणावांकडे त्या समजूतदारपणे बघतात. समजदार भूमिकेतून त्या प्रश्नांना सामोऱ्या जातात.[८]

१०) **अरूणा ढेरे :-**

अरूणा ढेरे यांचे पाच कथासंग्रह असून स्त्रीत्व हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. मध्ययुगीन आणि पौराणिक कालखंडातील स्त्रियांनी केलेला संघर्ष आणि त्यातून निर्माण झालेली स्त्रीची अस्मिता यांचा धागा जोडण्याचा प्रयत्न ही लेखिका करते. भ्रष्टाचार, दारिद्रय, राजकारण, कर्जबाजारी माणसे या सर्वांचे चित्रण अरूणा ढेरे यांच्या साहित्यातून घडते.

११) वसुधा पाटील :-

वसुधा पाटील यांचे २० कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. त्यांना घटनांपेक्षा व्यक्तीत रस आहे. त्यांनी मनोविश्लेषणापेक्षा निवेदनावर अधिक भर दिला आहे.

साठोत्तरी काळात मनोविश्लेषणवादी कुटुंबकथांचा मुख्य प्रवाह दिसतो. या प्रवाहात अंजली ठकार, नीलम गोऱ्हे, सुधा सोमण, उषा दातार, अजिता काळे, दीपा गोवारीकर, निर्मला देशपांडे, पद्मजा फाटक, रोहिणी कुलकर्णी, आशा कर्दळे, रेखा बैजल, मथु सावंत, जयश्री थत्ते, माधवी देसाई, छाया महाजन, वीणा देव, अश्विनी धोंगडे, माधुरी शानभाग, अनुराधा वैदय, सिसिलिया कार्व्हालो इ. स्त्री कथालेखिका कथालेखन करताना आढळतात. या कथालेखिकांच्या लेखनातून विशेषत: स्त्री पुरूष संबंधांचे चित्रण येते. एकतर हे संबंध विवाहामुळे निर्माण झालेले असतात किंवा विवाहबाह्य संबंध असतात नाहीतर कुटुंबातील नात्यामुळे दीर-भावजयीसारखे अन्य संबंध असतात. मध्यमवर्गीय कुटुंबे आणि त्यातील लहानमोठ्या घटना याभोवती मराठी लेखिका आपल्या कथा गूंफीत आहेत असे दिसते.

**अस्तित्ववादी कथा :-**

अस्तित्ववादी लेखक किंवा लेखिका माणसाच्या अस्तित्वाला फार महत्त्व देतात. 'जीवनातील अर्थशून्यता आणि माणसाचा एकाकीपणा तुटलेपणा हे आशयघटक मराठी कथेतून आरंभापासून अनेकदा व्यक्त झालेले आहेत. नवकथेच्या उदयानंतर तर या अनुभवांची आवर्तने होण्याचे प्रमाण फारच वाढले. अस्तित्ववादी कथेत मात्र हे आशयघटक एका खास शैलीत आणि अस्तित्ववादी पध्दतीने व्यक्त होतात. 'अस्तित्ववादी' विचारसरणीचा परिचय करून घेतल्यानंतरच मराठीतील अस्तित्ववादी कथेची स्थितीगती नेमकेपणाने लक्षात येऊ शकेल. 'अस्तित्ववादा'ला तत्वज्ञान म्हटले जात असले तरी रूढ अर्थाने ते तत्वज्ञान नाही. किंबहुना तत्वज्ञान मांडण्याच्या पध्दतीला आणि त्यातील वस्तुनिष्ठ आशयाला अस्तित्ववादी विरोध करतात. साहजिकच अस्तित्ववादाची निश्चित अशी गृहीतकृत्ये किंवा विचारव्यूह नाहीत.

अस्तित्वाचा अर्थ वस्तुनिष्ठ पध्दतीने मांडता येत नाही, तो त्या व्यक्तीला प्रत्येक क्षणाला व्यक्तिसापेक्षतेने जाणवतो, असे अस्तित्ववादयांना वाटते.[९]

कमल देसाई, मेघना फटांगरे आणि सुकन्या आगाशे या कथालेखिकांचा अस्तित्ववादी कथालेखनामध्ये समावेश होतो.

**१) कमल देसाई :-**

कमल देसाई यांचे 'रंग', 'काळा सुर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' हे तीन कथासंग्रह प्रसिध्द आहे. त्यांच्या कथेत वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ यांची सरमिसळ झालेली दिसते. कमल देसाईच्या कथांतील स्त्री पुरूष दु:ख भोगतात. त्यांची कथा निराळ्या वळणाची आहे. त्यांच्या कथेत माणसाचे हरवलेपण, जीवनातील अर्थशून्यता, एकाकीपणा यांचे चित्रण येते.

**२) मेघना फटांगरे :-**

मेघना फटांगरे ह्या अस्तित्ववादी कथालेखन करणाऱ्या कथालेखिका आहेत. 'मेघना फटांगरे यांचा 'खोल सूक्ष्म आवेश' हा एकमेव कथासंग्रह १९१५ साली प्रसिध्द झाला. त्यांच्या कथांमध्ये 'स्व'ने जोपासलेल्या स्वतंत्र वैचारिक भूमिकेला महत्त्व असते. समाजातील स्थिती-गतीतील परिवर्तनाचे व्यक्तिमनावर उमटलेले पडसाद, त्याचा 'व्यक्तीने' लावलेला अन्वयार्थ महत्त्वाचा असतो. भोवतालच्या आर्थिक, सामाजिक बदलांच्या संदर्भात स्वतंत्र भूमिका घेऊन जगणाऱ्या नायिका मेघना फटांगरे यांच्या कथेमध्ये दिसतात. भोवतालच्या आर्थिक, सामाजिक पर्यावरणाचा प्रत्येक व्यक्तीवर होणारा परिणाम भिन्न स्वरूपाचा असतो. हे अस्तित्ववादातील तत्व त्यांच्या कथेमध्ये दिसते.[१०]

**३) सुकन्या आगाशे :-**

सुकन्या आगाशे यांनी 'इस्पितळ आणि पतंग उडवणारा माणूस' हा कथासंग्रह लिहिला आहे. आधुनिकीकरणामुळे माणसांच्या जीवनात बदल झाला आहे याचे चित्रण त्यांच्या कथेमधून येते. तसेच त्यांच्या कथेमध्ये संवाद तुरळक स्वरूपात येतात आणि

त्या निवेदनावरच जास्त भर देतात. माणसांमध्ये आळस वाढत चालला आहे आणि त्यामुळे त्याच्या इच्छा-आकांक्षा जळून गेल्या आहेत असे लेखिकेला वाटते. उदासीनता, एकाकीपणा, अर्थशून्य जीवन त्यांच्या कथेतून व्यक्त होते.

**स्त्रीवादी कथा :-**

स्त्रीवादी कथेचा उदय प्रथम पाश्चात्य देशात झाल्याचा दिसतो. मानवी इतिहासाच्या वाटचालीत एक निखळ माणूस म्हणून स्त्रीचे स्थान निश्चित होण्यापेक्षा तिच्याकडे पुरूषसत्ताक मूल्य दृष्टीतून निर्माण केलेल्या प्रतिमेतून पाहिले गेले. स्त्री ही कुणाची तरी बहीण, माता, आजी, सून, काकी असते. ती एक निखळ स्त्री म्हणून असत नाही. तिची खेळणी लहानपणापासून मुलांपेक्षा वेगळी असतात. एकूणच स्त्रीला वेगळीच वागणूक दिली जाते. आजच्या स्त्रीला वारसा हक्कही कायदयाने मिळाला आहे. किंवा नवऱ्याच्या मालमत्तेवर हक्क सांगण्याचा अधिकारही तिला आहे. पण न्यायालयात जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण पाहिले तर मालमत्ता मागण्यासाठी कोर्टात जाणाऱ्या स्त्रिया अगदीच नगण्य असतात. ह्या उलट नवऱ्याच्या विरूध्द घटस्फोट, फारकत, पोटगी मागणाऱ्या किंवा नवऱ्याने दुसरा विवाह केला म्हणून न्यायालयाची पायरी चढणाऱ्या स्त्रियाच दिसून येतात. क्वचित नवऱ्याने आडमुठेपणा करून मुलांचा ताबा न दिल्यामुळे नाईलाजाने कोर्टात आलेल्या स्त्रिया आढळतात. ह्यावरून स्त्रियांची मानसिकता जशी जाणवते तशीच पुरूषांची स्त्रीकडे बघण्याची मानसिकताही फारशी बदलली नाही हेही जाणवते.[११] १९७० नंतर मात्र महाराष्ट्रामध्ये स्त्रीवादाचा उदय झाला. आधुनिक स्त्रीचे दुःख मांडण्याचा प्रयत्न सानिया, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, उर्मिला सिरूर, मेघना पेठे, अंबिका सरकार ह्या कथालेखिकांनी केला. या लेखिकांनी अत्यंत आत्मविश्वासपूर्वक आणि स्वतंत्र अशी आपली विचारसरणी मांडली.

**१) सानिया :-**

सानिया यांनी 'दिशा घराच्या', 'खिडक्या', 'प्रतीती', 'ओळख', 'शोध', 'प्रयाण' इ. कथासंग्रह लिहिले आहेत. त्यांच्या कथेत स्त्रीला प्रमुख स्थान असते.

त्यांच्या कथा विचार करायला प्रवृत्त करतात. तसेच त्यांच्या कथेतील माणसे संवेदनशील असतात. लैंगिक संबंधाचे चित्रण त्यांच्या कथेत येत नाही. त्यांच्या कथेतील नायिका स्वत:ची घडण स्वत: करतात आणि त्यातूनच शहाणपण येते असे लेखिकेला वाटते. सानिया उच्च वर्गाचे चित्रण करतात. आई, मुलगी, बहिणी बहिणी यांच्यातील नाते आणि त्यांच्यातील ताण-तणाव त्यांच्या कथेत वारंवार येतात.

**२) प्रिया तेंडुलकर :-**

प्रिया तेंडुलकर यांचे 'जावे तिच्या वंशा', 'ज्याचा त्याचा प्रश्न', 'असं ही', 'जन्मलेल्या प्रत्येकाला' हे कथासंग्रह आहेत. प्रिया तेंडुलकर पांढरपेशा समाजाचे चित्रण करतात. वैवाहिक जीवनातील स्त्रीचे प्रश्न, घटस्फोट, स्त्री पुरूष संबंध, करिअरचा प्रश्न त्या मांडतात. विभक्त कुटुंबपध्दतीमुळे आई ही एकटी पडते आणि मुलगा-सून नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडतात याचे चित्रण येते. प्रिया तेंडूलकर उच्च वर्गामध्ये राहिल्यामुळे त्यांच्या कथेत उच्चभ्रू लोकांचेच जास्त चित्रण होताना दिसते. त्यांच्या कथेत स्त्रीला प्रमुख स्थान आहे. त्यांच्या कथा वाचल्यानंतर विचार करायला लावतात. स्त्रियांचे प्रश्न त्या अचूकपणे मांडतात.

**३) गौरी देशपांडे :-**

'आहे हे असे आहे' आणि 'एकेक पान गळावया' हे कथासंग्रह गौरी देशपांडे यांच्या नावावर आहेत. '१९७० पासून त्यांचे लेखन चालू आहे. एक रोकडा विचार मांडणाऱ्या कौटुंबिक परंपरांचे पुर्नमूल्यमापन करणाऱ्या, सुबोध आकर्षक भाषाशैली. अवगत असणाऱ्या नव्या पिढीशी प्रांजळ, धाडशी हितगुज करणाऱ्या असांकेतिक आयुष्य त्रिखंडात जगणाऱ्या मराठीतल्या अपूर्व लेखिका म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.'[१२] स्त्रिया पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून सर्व क्षेत्रात आघाडीवर असल्याचे आपण पाहतो आणि ह्या नव्याने जाग्या झालेल्या स्त्रीचा झगडा गौरी देशपांडे आपल्या साहित्यातून मांडतात. बदलत्या परिस्थितीचे भान या लेखिकेला आहे म्हणून ही लेखिका जे भोगते, अनुभवते तेच आपल्या साहित्यातून स्पष्टपणे मांडते.

**४) उर्मिला सिरूर :-**

'कवडसा' हा उर्मिला सिरूर यांचा एकच कथासंग्रह आहे. त्या स्त्रीच्या देहाच्या लावण्याचा आविष्कार आपल्या कथेत मांडतात. त्यामुळे त्यांच्या कथांना कलात्मक उंची प्राप्त झालेली आहे.

**५) अंबिका सरकार :-**

'चाहूल' आणि 'प्रतिज्ञा' हे अंबिका सरकार यांचे दोन कथासंग्रह आहेत. कौटुंबिक जीवनामधील स्त्रीच्या मनातील वेदना त्या आपल्या कथेतून स्पष्टपणे मांडतात. संतती प्राप्त होण्यासाठी त्यातही पुत्र प्राप्तीसाठी निरूद्देश संभोग स्वीकारणाऱ्या स्त्रियांचे चित्रण त्या आपल्या कथेत करतात.

**६) मेघना पेठे :-**

मेघना पेठे यांचे 'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' हे दोन कथासंग्रह असून त्यांनी आपल्या व्यक्तिरेखांमधून माणूस शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कथेतील पात्रे ही चांगल्या आणि वाईट गुणांनी युक्त अशी आहेत. रोखठोक शैली, सद्‌गुण-दुर्गुणांचे चित्रण आणि एकटेपणाची जाणीव ही त्यांच्या लेखनाची वैशिष्टये होत. मेघना पेठे ह्या मराठीतील नावाजलेल्या लेखिका आहेत.

अशा ह्या नव्या वाटेने जाणाऱ्या, आपले अनुभवविश्व साहित्यातून मांडणाऱ्या गौरी देशपांडे, सानिया, उर्मिला सिरूर, अंबिका सरकार, सुकन्या आगाशे इ. काही लेखिका मराठी कथेला नवे वळण देताना दिसतात.

**ग्रामीण कथा :-**

ग्रामीण कथा म्हटले म्हणजे आपल्याला तेथील परिसर, गुरे-ढोरे, पिके, पाणी, नदी, नाले, ओढे, झाडे-झुडपे, तेथील साधी भोळी माणसे, तेथील सणवार, चाली-रीती, रूढी-परंपरा इ. ची आठवण होते. ग्रामीण कथालेखन करणारे शंकर पाटील, आनंद यादव, द.मा. मिरासदार, रा.रं. बोराडे, ग.दि. माडगूळकर इ. कितीतरी कथाकार नजरेसमोर येतात. याबरोबर प्रतिमा इंगोले, सरोजिनी बाबर, अनुराधा गुरव, मधु

सावंत या कथालेखिकांनीही कथालेखन केल्याचे दिसते. ग्रामीण जीवन आणि ग्रामीण परिसर याचे वास्तव चित्रण करणाऱ्या कथांना आपण ग्रामीण कथा म्हणतो. अशा ग्रामीण समाजाचे चित्रण करणाऱ्या प्रतिमा इंगोले ह्या आघाडीच्या लेखिका होत.

**१) प्रतिमा इंगोले :-**

डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांचे कथालेखन विपुल आहे. 'हिरवे स्वप्न' (१९९४), 'हजारी बेलपान' (१९८४), 'सुगरनचा खोपा' (१९८९), 'लेक भुईची', 'अकसिदीचे दाने' (१९८६), 'जावयाचं पोर' (१९८९) इ. कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. प्रतिमा इंगोले यांनी विदर्भातील लोकांचे जीवन, राहणीमान, त्यांची बोलीभाषा, ठसकेबाज संवाद, तसेच भोळी-भाबडी, विद्रोह न करणारी, आहे त्या परिस्थितीत जगणाऱ्या माणसांचे चित्रण त्यांनी आपल्या कथासाहित्यातून केले. म्हणी व वाक्प्रचारांचा भरपूर वापर त्यांनी केलेला आढळतो. मराठीतील एक प्रथितयश लेखिका म्हणून त्या नावाजल्या जातात. विदर्भातील लोकांच्या रूढी-परंपरा, रीती-रिवाज, प्रथा, श्रध्दा, सणवार यांचे सूक्ष्म असे निरीक्षण केले आहे. त्यांची कथा ही प्रादेशिक कथा म्हणून ओळखली जाते.

**२) सरोजिनी बाबर :-**

सरोजिनी बाबर ह्या लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण जीवनाचे कृषीकेंद्रित समाजजीवन, गावगाडा, कुटुंबव्यवस्था, दारिद्रय, लोकसमजुती, लोकपरंपरा या सर्वांचे चित्रण आपल्या साहित्यातून केले आहे.

**३) अनुराधा गुरव :-**

अनुराधा गुरव यांचा 'म्हातारीनं झाकला कोंबडा' हा कथासंग्रह असून त्यातून त्यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. त्यांच्या कथांमध्ये सासू-सून यांचे नाते बऱ्याचवेळा येते. तसेच परंपरा मानणाऱ्या स्त्रियांचे चित्रण त्यांच्या कथेत येते. ग्रामीण भागातील स्त्रिया आपल्या पातिव्रत्याला खूप महत्त्व देतात आणि आपल्या अब्रूला प्राणपणाने जपतात या सर्वांचे मनोज्ञ चित्रण त्यांच्या साहित्यात येते.

**दलित कथा :-**

दलित कथा लिहिणारे कितीतरी लेखक आहेत की, ज्यांनी आपल्या व्यथा, वेदना आपल्या साहित्यातून मांडल्या आहेत. परंतु दलित स्त्रीकथाकार म्हटले तर एकच नाव नजरेसमारे येते ते म्हणजे उर्मिला पवार हे होय.

**उर्मिला पवार :-**

'चौथी भिंत' आणि 'सहावं बोट' हे उर्मिला पवार यांचे दोन कथासंग्रह आहेत. त्या आपल्या कथांमधून दलित स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार आपल्या साहित्यातून मांडतात. या दोन्ही कथासंग्रहातील कथेमध्ये कष्टकरी दलित स्त्रीचे चित्रण येते. उर्मिला पवार यांच्या कथेमध्ये आलेली अन्यायाला प्रतिकार करणारी, लढाऊ दलित स्त्री प्रतिमा मराठी कथेच्या तसेच दलित कथेच्या संदर्भात नावीन्यपूर्ण वाटते. 'चोळी' हा शब्द द्वयार्थाने वापरून स्त्रीची मजा बघणारे पुरूष आणि स्त्रियासुध्दा 'कवच' या कथेमध्ये दिसतात.

याशिवाय उर्मिला पवार यांच्या कथांमध्ये नवजागृत दलित तरूणांचे चित्रणही येते. साध्या, सोप्या भाषेतील निवेदन, ग्रामीण आणि दलित स्तरातील बोलीभाषा, कोकणातील प्रदेशवर्णन ही उर्मिला पवार यांच्या कथेची वैशिष्टये असल्याचे दिसते.[१३]

**विज्ञान कथा :-**

मराठी कथेतील विज्ञान कथा हा एक नवा वाङ्मय प्रकार होय. समाजात विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन रूजविणे तसेच विज्ञानाचे फायदे आणि तोटे स्पष्ट करून सांगणे,. अंधश्रध्दा नष्ट करणे हे विज्ञानकथांचे मुख्य उद्दिष्ट असते. विज्ञानकथा ह्या पुराव्यांवरती भर देतात. स्वत:च्या कल्पनाशक्तीची भर घालून विज्ञानकथांमध्ये चित्रण केले जाते.

**१) रेखा बैजल :-**

विज्ञान कथा लिहिणाऱ्या लेखिकांमध्ये रेखा बैजल ह्या एक विज्ञान कथालेखिका होत. 'विज्ञानकथा' (१९९१) आणि किडनॅपिंग हे रेखा बैजल यांचे दोन कथासंग्रह.

रेखा बैजल यांच्या कथांमध्ये वैज्ञानिक संशोधनातील गूढता, साहसी प्रयोग, त्यातील ताणतणाव, भिती यातून वाचकांची उत्सुकता शेवटपर्यंत कायम राखली जाते.[१४]

**२) माधुरी शानभाग :-**

'पुनर्जन्म' हा त्यांचा एक कथासंग्रह आहे. माधुरी शानभाग भौतिक शास्त्राच्या प्राध्यापिका आहेत. विज्ञान हा त्यांचा आवडता विषय असल्यामुळे वैज्ञानिक सत्य व दैनंदिन जीवनाची सांगड लेखिकेने घातली आहे. हेतूशिवाय जीवन जगणे म्हणजे शाप आहे असे या लेखिकेने आपल्या कथेमध्ये चित्रण केले आहे.

**पौराणिक, ऐतिहासिक कथा :-**

वेद, पुराण, इतिहास हे विषय फार पूर्वीपासून चालत आलेले आहेत. अलीकडील लेखिकांनी मात्र पुरातन काळातील किंवा इतिहासातील व्यक्तींची उदाहरणे घेऊन प्रचलित समाजातील लोकांच्या वृत्ती-प्रवृत्तींचे चित्रण केले आहे. त्यामध्ये दुर्गा भागवत, सुशिला चिकटे, मृणालिनी देसाई, आशा दामले, विजया जहागिरदार, रोहिणी कुलकर्णी, अरूणा ढेरे ह्या लेखिका लेखन करताना दिसून येतात.

**१) दुर्गा भागवत :-**

दुर्गा भागवत ह्या मानववंशशास्त्राच्या व लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत. त्यांनी 'पूर्वा' हा कथासंग्रह लिहिला आहे. त्यांनी प्राचीन लोककथांचा आपल्या कथा लिहिताना आधार घेतला आहे.

**२) सुशीला चिकटे :-**

सुशीला चिकटे यांनी 'प्रफुल्ला' आणि 'परिचिता' हे दोन कथासंग्रह लिहिले आहेत. पौराणिक प्रसंगावर आधारित त्यांनी आपल्या कथांची निर्मिती केली आहे.

**३) मृणालिनी देसाई :-**

मृणालिनी देसाई यांचा 'रूसवा' हा कथासंग्रह आहे. त्यात त्यांनी पौराणिक आणि ऐतिहासिक प्रेमकथाच लिहिल्या आहेत. सामान्य रसिक वाचकांना असामान्य

माणसांच्या प्रेमभावना वाचण्यात आनंद मिळतो तेच त्यांनी आपल्या कथेतून लिहिले आहे.

**४) विजया जहागिरदार :-**

विजया जहागिरदार यांचा 'कालचक्र' हा कथासंग्रह असून त्यात गांधारी, देवकी, यशोदा, कैकयी इ. स्त्रियांचे अनुभव सांगून आजच्या स्त्रियांनाही तेच अनुभव येतात याचे चित्रण करतात. त्यांची कथा लिहिण्याची शैली खूप चांगली आहे.

**५) अरूणा ढेरे :-**

अरूणा ढेरे यांच्या 'भगव्या वाटा' आणि 'कृष्णकिनारा' हे दोन कथासंग्रह आहेत. यात त्यांनी प्राचीन स्त्रियांची दु:खे मांडली आहेत. बोधवादाच्या मांडणीसाठी तर कधी प्रेमकथांना पार्श्वभूमी म्हणून त्यांनी पौराणिक व ऐतिहासिक कथा लिहिल्या आहेत. महाभारतातील कुंती, द्रौपदी, राधा या व्यक्तिरेखांची मांडणी त्यांनी 'कृष्णकिनारा' या कथासंग्रहात केली आहे.

**६) आशा दामले :-**

आशा दामले यांनी पुरूषसत्ताक दृष्टीकोनाचा रामाकडे पाहण्याचा दृष्टीकोन भोंगळ आहे असे आपल्या कथेतून मांडले आहे.

**विनोदी कथा :-**

स्त्रियांनासुध्दा विनोदबुध्दी असते हे शकुंतला परांजपे, शकुंतला बोरगांवकर, इंद्रायणी सावकार, शकुंतला फडणीस या लेखिकांनी दाखवून दिले. शाब्दिक कोटया आणि प्रसंगनिष्ठ विनोद इ. ने विनोदनिर्मिती केली जाते. विनोदनिर्मिती करताना बऱ्याचवेळा अश्लील लिहिण्याची शक्यता असते.

**१) शकुंतला परांजपे :-**

शकुंतला परांजपे यांनी १८५७ साली 'माझी प्रेतयात्रा' हा कथासंग्रह लिहिला. निर्भिड दृष्टीकोन, स्वतंत्र बुध्दीमत्ता यामुळे त्यांना कशाचाही आधार घ्यावा लागत नाही. स्त्रीवादाच्या कुबड्याही तिला घ्याव्या लागत नाहीत.

२) **शकुंतला बोरगांवकर :-**

शकुंतला बोरगांवकर यांनी 'जावई चालून आला', 'लोणकढी' आणि 'गालातल्या गालात' हे कथासंग्रह लिहिले असून त्यात त्यांनी अतिशयोक्ती आणि कोटीबाजपणाचा वापर केला आहे.

३) **इंद्रायणी सावकार :-**

'एकेकाचं नशीब', 'मंगळसूत्र', 'और चाभी खो जाय', 'चुकभूल' हे इंद्रायणी सावकार यांचे कथासंग्रह आहेत. ह्या नावाजलेल्या प्रसिध्द विनोदी लेखिका आहेत.

४) **शकुंतला फडणीस :-**

शकुंतला फडणीस यांचे चार कथासंग्रह आहेत. ह्या प्रसिध्द विनोदी लेखिका आहेत. प्रसिध्द व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांच्या त्या पत्नी आहेत.

**लघुत्तम कथा :-**

लघुत्तम कथा लिहिणाऱ्या छाया महाजन, मंदाकिनी गोगटे, दीपा गोवारीकर, मंगला गोडबोले ह्या लेखिका होत.

१) **मंदाकिनी गोगटे :-**

मंदाकिनी गोगटे यांचे सहा कथासंग्रह असून त्यांच्या काही कथा विनोदी वळणाच्या आहेत तर काही कथा गंभीर प्रवृत्तीच्या असल्या तरी त्यातून विनोदाची निर्मिती करतात.

२) **मंगला गोडबोले :-**

मंगला गोडबोले यांच्या लेखनात स्त्रीस्वभावातील निरीक्षणशक्ती आणि चौकस बुध्दीमुळे त्यांच्या कथेमध्ये विनोद निर्माण होताना दिसतो.

३) **दीपा गोवारीकर :-**

दीपा गोवारीकर यांनी मध्यमवर्गीयांवरही हलक्या फुलक्या कथा लिहिल्या. त्यांनी कुटुंबकथा लिहिल्या आहेत. पुरूषांना त्या विनोदाचा विषय बनवतात.

४) छाया महाजन :-

लघुत्तम कथांचा आकृतिबंध छाया महाजन यांनी हाताळला असून छोट्या छोट्या आशयातून जीवनाचे गहिरे तत्वज्ञान व्यक्त केले आहे.

अशा ह्या लघुत्तम कथा लिहिणाऱ्या फारच थोड्या स्त्रिया आहेत.

**समारोप :-**

या सर्व स्त्रियांच्या कथालेखनाचा समग्र विचार केला तर असे लक्षात येते की, प्राधान्याने या स्त्रिया 'प्रेमानुभवा'चे चित्र रेखाटतात. त्यांच्या कथांतून विशेषत: स्त्री-पुरूष संबंधाचे चित्रण केले जाते. तसेच कथेशी साधर्म्य असणारे अनेक वाङ्मय प्रकार स्त्रियांनी हाताळले आहेत. 'कुटुंबकथा' हे स्त्रियांचे अनुभवविश्व असल्यामुळे त्यांनी अवतीभोवतीच्या व्यक्ती जिवंत केल्या आहेत. वास्तवाचे चित्रण करणाऱ्या कमल देसाई, मेघना फटांगरे, सुकन्या आगाशे यांनी अस्तित्ववादी कथा हा प्रवाह मराठीत आणला. तसेच बिनधास्त, बेफिकीर, स्वतंत्र विचारांच्या कुटुंबातील मानसिक ताण-तणावाचे चित्रण करणाऱ्या सानिया, अंबिका सरकार, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर इ. स्त्रीकथालेखिका होत. विज्ञानकथा, ग्रामीण कथा, दलित कथा, विनोदी कथा, पौराणिक, ऐतिहासिक कथा आणि लघुत्तम कथा हे सर्व प्रकार कुटुंबव्यवस्थेच्या संदर्भातच आलेले दिसतात. उर्मिला पवार यांनी दलित कथा लिहिलेली आढळते. तर ग्रामीण कथा प्रतिमा इंगोले, सरोजिनी बाबर, अनुराधा गुरव इ. नी समर्थपणे लिहिलेली दिसते. विज्ञानकथा माधुरी शानभाग व रेखा बैजल या कथालेखिकांनी लिहिल्याचे दिसते. विनोदी कथा शकुंतला फडणीस, शकुंतला बोरगांवकर, इंद्रायणी सावकार यांनी लिहिली तर लघुत्तम कथा, छाया महाजन, मंगला गोडबोले, दीपा गोवारीकर इ. कथालेखिकांनी लिहिली. थोडक्यात, ह्या सर्व स्त्रियांनी कथेच्या सर्वच प्रकारांत कथालेखन केल्याचे दिसते. त्यांनी कथावाङ्मय प्रकाराला समृध्द केले आहे.

**संदर्भ :-**


१. 'अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा', प्रदक्षिणा खंड पहिला, संपा. म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, नववी आवृत्ती १९९७, पृ. १५३.

२. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड २' (इ.स. १९५१ ते २०००) सं. डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दिक्षीत, डॉ. अरूणा ढेरे, विनया खडपेकर, मार्गदर्शन - डॉ. सरोजिनी वैद्य. भारती विदयापीठ अभिमत विश्वविद्यालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांचा संयुक्त प्रकल्प, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००२, पृ. १०६, १०७.

३. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. १३०.

४. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड २'(इ.स. १९५१ ते २०००) सं. डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरूणा ढेरे, विनया खडपेकर, मार्गदर्शन डॉ. सरोजिनी वैदय, भारती विदयापीठ अभिमत विश्वविदयालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांचा संयुक्त प्रकल्प, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००२, पृ. १०८.

५. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. १४०.

६. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. १३३,१३४.

७. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. १३४.

८. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड २' (इ.स. १९५१ ते २०००) सं. डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरूणा ढेरे, विनया खडपेकर, मार्गदर्शन डॉ. सरोजिनी वैदय, भारती विदयापीठ अभिमत विश्वविदयालय आणि साहित्यप्रेमी

भगिनी मंडळ, पुणे यांचा संयुक्त प्रकल्प, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००२, पृ. ११३.

९. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. २३०.

१०. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड २' (इ.स. १९५१ ते २०००) सं. डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरूणा ढेरे, विनया खडपेकर, मार्गदर्शन डॉ. सरोजिनी वैदय, भारती विदयापीठ अभिमत विश्वविदयालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांचा संयुक्त प्रकल्प, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००२, पृ. १०८.

११. 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?', डॉ. प्रतिमा इंगोले, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., प्रथमावृत्ती, १५ जानेवारी २००१, पृ.१८,१९.

१२. 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा', इ.स. १९४७ ते २०००, प्रदक्षिणा खंड दुसरा, संपा. म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९९८, पृ. १४४-१४५.

१३. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड २'(इ.स. १९५१ ते २०००) सं. डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरूणा ढेरे, विनया खडपेकर, मार्गदर्शन डॉ. सरोजिनी वैदय, भारती विदयापीठ अभिमत विश्वविदयालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांचा संयुक्त प्रकल्प, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००२, पृ. १२६.

१४. 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड २'(इ.स. १९५१ ते २०००) सं. डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरूणा ढेरे, विनया खडपेकर, मार्गदर्शन डॉ. सरोजिनी वैदय, भारती विदयापीठ अभिमत विश्वविदयालय आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे यांचा संयुक्त प्रकल्प, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००२, पृ. १२८.